# <u>दोन मुले आणि त्यांच्या योजना</u>

“हो, मी आत्ताच माझ्या आई-बाबांना विचारणार आहे. तू?” विजयनी दीपकला फोनवर विचारले.

“मीसुद्धा. माझे बाबा आत्ताच घरी आलेत. आणि तू चकल्या आणणार आहेस ना?” दीपकने उत्तर दिले.

विजय हसला. दीपकला सारखीच भूक लागायची. “हो, मी चकल्या आणीन. आणि त्यांना नक्की सांग की आम्ही साडे-नऊला दिवे बंद करू.”

विजयनी फोन ठेवला. *आता फक्त आई-बाबांची परवानगी मिळवायची,* त्यानी विचार केला. त्यानी धीर गोळा केला, चेहऱ्यावर हसू आणले, आणि आई-बाबांच्या खोलीत शिरला.

“बाबा,” विजय अगदी हळूच म्हणाला. “मी कापलेलं गवत साफ करून ठेवलंय.”

“अरे वा! छान.” बाबांनी मान डोलावली.

“आई? बाबा?” विजयनी पुन्हा सुरुवात केली. त्याच्या आई-बाबांनी त्यांच्या वर्तमान-पत्रांवरून बघितले. आणि विजय एकदम भरकन बोलून गेला - “दीपक आणि मी विचार करत होतो की आज रात्री आम्ही बाहेर तंबूत झोपू शकतो का. आम्ही खूप उबदार रजई घेऊ, खूप खाणार नाही, आणि साडे-नऊला दिवे बंद करू, नक्की!”

आई-बाबांनी एकमेकांकडे पाहिले. *काहीच न म्हणता ते एकमेकांशी कसेकाय बोलतात,* विजयला प्रश्न पडला होता.

“दीपकच्या आई-बाबांनी परवानगी दिली आहे?” आईने विचारले.

“तो आत्ता त्याच्या आई-बाबांना विचारतो आहे.” चाळवा-चाळव करत विजय म्हणाला. आई-बाबांनी पुन्हा एकमेकांकडे पाहिले.

“ठीक आहे. जर दीपकच्या आई-बाबांना मान्य असेल तर आम्हालाही मान्य आहे.” बाबा म्हणाले.

“Thank you आई, thank you बाबा!” विजय सुसाट फोनकडे पळाला. त्यांनी फोन लावला आणि श्वास रोखून दीपकच्या आवाजाची वाट बघत थांबला. पलिकडून दीपकचा आवाज आला.

“हो?” विजयनी विचारले.

“हो!” दीपक उद्गारला.

~~~~~~~~~~

१. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा:

परवानगी, वर्तमानपत्र, उबदार, रजई, मान्य, सुसाट, चाळवा-चाळव करणे, श्वास रोखणे

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________
~~~~~~~~~~

२. सुरुवातीला जेव्हा विजय आणि दीपक फोनवर बोलत होते, तेव्हा तुम्हाला ते कशाबद्दल बोलत आहेत असे वाटले?

३. विजयनी बाबांना गवताबद्दल का सांगितले असेल?

४. विजय उबदार रजई आणि साडे-नऊला दिवे बंद करण्याबद्दल का बोलला असेल?

५. विजयने मनात बोललेले एक वाक्य लिहा.